ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

# राष्ट्रीय कृषी विमा योजनेचा महाराष्ट्रातील प्रगतीचा आढावा

**प्रा. डॉ. दातीर आर.के.**
**अर्थशास्त्र विभाग प्रमुख**
**सिडको कॉलेज, नाशिक**

**आव्हाड भास्कर सोमनाथ**
**पीएच. डी. संशोधक,**
**आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे**

भारतातील शेती प्रामुख्याने पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी अपुऱ्या पावसामुळे, गारपीटीमुळे तसेच कधी रोगराई व कीडीमुळे शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार तोटा सहन करावा लागतो. शेती हा व्यवसाय असल्याकारणांमुळे त्यांना पण भांडवलाची गरज असते. शेतकरी शेतीसाठी लागणारे भांडवल नातेवाईक, सावकार, सहकारी पतसंस्था, जिल्हा सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक यांच्याकडून कर्जरुपाने घेतो. निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातुन अपेक्षित उत्पन्न न मिळाल्यास त्याने घेतलेल्या कर्जाचे तो परतफेड करु शकत नाही. त्यामुळे तो थकबाकीदार बनतो. पुन्हा नविन हंगामासाठी आवश्यक असणारे कर्ज मिळत नाही. वरील सर्व बाबींचा अभ्यास करुन शेतकऱ्यांना शेती व्यवसायास विमा संरक्षण देण्याचे सरकारने ठरविले

<u>राष्ट्रीय कृषी विमा योजनेचा महाराष्ट्रातील प्रगतीचा आढावा</u>

## १. प्रस्तावना -

कृषी जगातील सर्वाधिक लोकसंख्येच्या उपजिविकेचे साधन तसेच उत्पन्नाचा स्त्रोत आहे. भारतही त्यास अपवाद नाही. भारतात ६५ टक्के लोकांचा शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. भारतातील शेती प्रामुख्याने पावसाच्या लहरीपणावर अवलंबून आहे. कधी ओला दुष्काळ तर कधी अपुऱ्या पावसामुळे, गारपीटीमुळे तसेच कधी रोगराई व कीडीमुळे शेती उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे शेतकऱ्यांना वारंवार तोटा सहन करावा लागतो. शेती हा व्यवसाय असल्याकारणांमुळे त्यांना पण भांडवलाची गरज असते. शेतकरी शेतीसाठी लागणारे भांडवल नातेवाईक, सावकार, सहकारी पतसंस्था, जिल्हा सहकारी बँक, राष्ट्रीयकृत बँक यांच्याकडून कर्जरुपाने घेतो.

निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना शेती क्षेत्रातुन अपेक्षित उत्पन्न न मिळाल्यास त्याने घेतलेल्या कर्जाचे तो परतफेड करु शकत नाही. त्यामुळे तो थकबाकीदार बनतो. पुन्हा नविन हंगामासाठी आवश्यक असणारे कर्ज मिळत नाही. वरील सर्व बाबींचा अभ्यास करुन शेतकऱ्यांना शेती व्यवसायास विमा संरक्षण देण्याचे सरकारने ठरविले आणि राज्य सरकारांना शेती व्यवसायास विमा संरक्षण देण्याच्या सूचना केल्या. सदर लेखामध्ये कृषी विमा योजनेची सुरुवात, योजनेचे स्वरुप, योजनेची उद्दिष्टये, योजनेची महाराष्ट्रातील प्रगती (२००७-०८ ते २०१०-११) आणि समस्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

२. **उद्दिष्टये आणि अभ्यासपध्दती -**

प्रस्तुत लेखासाठी उद्दिष्टये आणि अभ्यासपध्दती खालील प्रमाणे आहेत.

१. राष्ट्रीय कृषि विमा योजना उत्क्रांतीचा अभ्यास करणे.

२. राष्ट्रीय कृषि विमा योजनेचे स्वरुप, आणि उद्दिष्टये स्पष्ट करणे.

३. राष्ट्रीय कृषि विमा योजनेचा महाराष्ट्रातील प्रगतीचा आढावा घेणे.

४. राष्ट्रीय कृषि विमा योजना अधिक प्रभावी होण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

प्रस्तुत लेख लिहिण्यासाठी प्रामुख्याने द्वितीय माहिती व आकडेवारीचा वापर करण्यात आलेला आहे. द्वितीय माहिती व आकडेवारी, विविध संदर्भ ग्रंथ, नियतकालीके, भारताची आर्थिक सर्वेक्षणे, महाराष्ट्राची आर्थिक सर्वेक्षणे, विविध संकेत स्थळे इत्यादी स्त्रोतांमधून संकलित करण्यात आली आहे. संकलित माहिती वर्णनात्मक स्वरुपात मांडण्यात आलेली आहे.

३. **राष्ट्रीय कृषी विमा योजनेची उत्क्रांती -**

भारतातध्ये पिक विमा लागु करण्याची सुचना स्वातंत्र्यपूर्व काळापासून करण्यांत आली. अमेरिकेत जसा संघीय पीक विम्याचा उपयोग केला जातो त्या आधारावर भारतात पीक व पशु विमा सुरु करावा असे डॉ. नायडू समितीने मद्रास प्रांतातील अभ्यासात सुचविले. तसेच सरैय्या समिती, प्रियोळकर समिती व इतर काही समित्यांनी पीक विम्याचे आग्रही प्रतिपादन केले होते.

सन १९६९ मध्ये पंजाबच्या काही भागात गहु, हरबरा, कापूस आणि ऊस या पिकांसाठी पिक विम्याचा प्रयोग करण्यांत आला. परंतु या प्रयोगाला फारसे यश आले नाही. भारतात शेतकऱ्यांची धारण क्षेत्रे हे मोठया आणि छोटया स्वरुपात आहे. त्यामुळे वैयक्तिक आधारावर पीक विम्याची योजना लागू करणे कठीण असल्यामुळे क्षेत्राधारित किंवा गट आधारावर विमा काढण्याची कल्पना पूढे आली. १९७९ पासुन राज्य सरकारांच्या सहाय्याने क्षेत्राधारीत विमा योजना लागू करण्याचे काम जनरल इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (GIC) ही संस्था करते. ही योजना १२ राज्यांनी स्विकारली होती.

अ) पीक विम्याची व्यापक योजना - (Comprehensive Crop Insurance Scheme) (१९८५-९९) -

१९८५-८६ च्या अंदाजपत्रकात सरकारने ही योजना घोषितकेली. व १९८५ च्या खरीप हंगामापासून ती लागू झाली. राज्य सरकार आणि GIC यांच्याद्वारा ही योजना राबविली जाते. सहकारी संस्था, व्यापारी बँका व ग्रामीण बँका यांनी दिलेली पिक कर्ज आणि विमा यांची सांगड घालण्यात आली.

विम्याची रक्कम देण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारांची असून तिचे प्रमाणे अनुक्रमे ६७ टक्के व ३३ टक्के आहे, धान्य,तेलबिया, डाळी व तृणधान्ये या पिकांना ही योजना लागू करण्यांत आली सन १९८५ ते १९९७-

९८ पर्यंत रब्बी पिकांसाठी साधारणत: ६.४५ करोड शेतकरी या योजनेत सामिल करण्यांत आले. या योजनेचा सर्वांत जास्त फायदा गुजरात (४७%), त्या खालोखाल आंध्र (२१%), महाराष्ट्र (९%) आणि ओरिसा (८%) असा झाला होता.

ब) प्रयोगात्मक पिक विमा योजना (Experimental Crop Insurance Scheme (FCIS)(१९९७-९८)) :

सन १९९७-९७ च्या रब्बी हंगामात भारत सरकारने काही निवडक जिल्हयांसाठी ही योजना राबवण्याचा निर्णय घेतला. ही योजना केवळ ५ राज्यांच्या १४ जिल्हयांत राबवण्यात आली. या योजनेत केंद्र व राज्य सरकारांचा हिस्सा ४:१ असा होता. या योजनेत सन १९९७-९८ च्या रब्बी हंगामात साधारणपणे ४.७८ लाख शेतकऱ्यांना योजनेत सामील करण्यात आले. २.८६ करोड रुपये हप्त्याच्या रुपाने जमा करण्यांत आले. आणि त्यांना नुकसान भरपाईच्या रुपात ३९.७८ करोड रुपये देण्यात आले. हया योजनेला १९९८ च्या खरीप हंगामापासून स्थगिती देण्यात आली.

क) राष्ट्रीय कृषि विमा योजना (NAIS) :

शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य देण्याचा उद्देश पुर्ण होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे या योजनेची व्यापकता वाढवण्याच्या दृष्टीने पीक विमा योजनेची पीक कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांपुरते मर्यादित स्वरुप बदलुन कर्जदार तसेच बिगर कर्जदार अशा सर्वच शेतकऱ्यांना सहभागी करुन घ्राष्ट्रीय कृषी विमा योजनाङ ही सुधारीत स्वरुपात १९९९-२००० च्या रब्बी हंगामापासून राज्यांत राबविण्यांत येत आहे. महाराष्ट्र शासनाने सन १९९९ पासून ही योजना राबविलेली आहे.

**योजनेचा उद्देश -**

नैसर्गिक आपत्तीमध्ये तसेच किड व रोगांचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव झाल्यास शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे, शेतकऱ्यांना नविन तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन देणे, आणि आपत्ती मध्ये शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे हे या योजनेचे प्रमुख उद्देश आहेत.

योजनेची वैशिष्टये -

राष्ट्रीय कृषि पीक विमा योजनेचे वैशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

१. कर्जदार शेतक-यांसाठी ही योजना अनिवार्य तर बिगर कर्जदार शेतक-यांनी ती ऐच्छिक स्वरुपाची ठेवली आहे. (खरीप २००६ हंगामापासून कर्जदार शेतक-यांनाही योजनेतील सहभाग ऐच्छिक ठेवण्यात आला आहे.)

२. नविन पिकांचा समावेश करुन त्यांची व्याप्ती वाढविण्यात आली आहे. (मुग, उडीद, कापूस, कांदा, मका व ऊस या पिकांचा समावेश)

३. विमा संरक्षित रक्कमेची व्याप्ती वाढवुन त्यांची सांगड सरासरी उत्पन्न व किमान आधारभूत किंमतीशी घालण्यात आलेली आहे.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

४. शेतक-यांना सर्वसाधारण जादा पिक संरक्षित रक्कम सरासरी उत्पन्नाचा १५०% विमा संरक्षण उपलब्ध आहे.

५. खातेदारांव्यतिरिक्त कुळांसाठी सुध्दा ही योजना खुली ठेवण्यात आलेली आहे.

६. पिक पेरल्यापासून ते पिक कापणीपर्यंत विमा संरक्षण.

वरील प्रमाणे राष्ट्रीय कृषी विमा योजनेची वैशिष्टये आहे. या योजनेत खालील पिकांचा समावेश करण्यात आलेला आहे.

अ) खरीप - भात, ज्वारी, बाजरी, नागली, मका, तुर, मुग,उडीद, भुईमुग, तीळ, सुर्यफुल, कारला, सोयाबीन, ऊस, कापूस, कांदा

ब. रब्बी - गहु, ज्वारी, हरभरा, सुर्यफुल, करडई, कांदा,

वरील खरीप व रब्बी पिकांचा समावेश राष्ट्रीय कृषी विमा योजनेत करण्यात आलेला असला तरी पण केळी, फळबागा, यांचा समावेश केलेला नाही.

विमा संरक्षणाच्या बाबी - खालील बार्बीसाठी शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यात येईल.

अ) नैसर्गिक आग, बीज कोसळणे

ब) वादळ, चक्रीवादळ,अतिवृष्टी

क) पूर, भुस्खलन, दुष्काळ

ड) किड व रोग इत्यादी

मात्र युध्द व अणुयुध्दाचे दुष्परिणाम तसेच हेतुपुरस्कर केलेल्या नुकसानीस विमा संरक्षण मिळणार नाही.

**विमा हप्ता दर -**

पिक निहाय विमा हप्त्याचे दर केंद्र सरकार, राज्य सरकार व भारतीय सर्वसाधारण विमा निगम यांच्या शिफारशीनुसार ठरविण्यांत येतात. दर हंगामासाठी व पिकांसाठी विमा हप्त्याचे दर वेगवेगळे ठरविण्यात येतात.

## ४. राष्ट्रीय कृषी विमा योजनेची महाराष्ट्रातील प्रगती :-

सदर योजना महाराष्ट्रात सन १९९९ पासून व्यापक स्वरुपात राबवण्यात येत आहे. ही योजना खरीप व रब्बी दोन्ही हंगामात राबवण्यात आलेली आहे. राष्ट्रीय कृषी विमा योजनेची महाराष्ट्रातील प्रगती ही खालील तक्ता क्र. १ नुसार स्पष्ट करता येईल.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{Bi-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

**राष्ट्रीय कृषी विमा योजनेची महाराष्ट्रातील प्रगती**

(२००७-०८ ते २०१०-११)

| वर्ष | सहभागी शेतकरी (लाखात) | विम्याची रक्कम (रु. कोटीत) | हप्त्याची रक्कम (रु. कोटीत) | लाभधारक शेतकरी (००) | दिलेली भरपाई (रु.कोटीत) |
|---|---|---|---|---|---|
| २००६-०७ | १६.७६ | ८५०.३५ | ३८.४५ | ६.२१ | १४०.५९ |
| २००७-०८ | १९.८३ | ८७९.२२ | ३२.१२ | २.६० | ८६.३१ |
| २००८-०९ | ३५.०२ | १६६५.४५ | ७४.८१ | १७.२३ | ४७३.९१ |
| २००९-१० | ३१.८३ | २५०७.१६ | १०३.०५ | १३.२९ | ३७६.२६ |
| २०१०-११ | २२.०४ | १३२४.६४ | ५१.७२ | ०.८५ | १४.८४ |
| **एकुण** | **१२५.४८** | **७२२६.८२** | **३००.१५** | **४०.१२** | **१०९१.९१** |

**स्त्रोत - महाराष्ट्राची आर्थिक पाहणी .**

वरील तक्त्यावरुन महाराष्ट्रातील कृषी विमा योजनेची प्रगती समाधान कारक असल्याचे स्पष्ट होते. २००६-०७ मध्ये या योजनेत १६.७६ लाख शेतकरी सहभागी झाले होते. २००७-०८ मध्ये यात वाढ होऊन १९.८३ लाख शेतकरी इतकी झाली. यात सतत वाढ झालेली दिसून येते. पण २०१०-११ या वर्षी त्यात घट झालेली आढळ्ते. एकुण पाच वर्षाचा विचार करता १२५.४८ लाख शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग घेतल्याचे दिसते.

लाभधारक शेतकऱ्यांचा विचार करता सन २००६-०७ मध्ये ६२१०० इतक्या शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ झालेला आहे. २००७-०८ मध्ये २६००० लाभधारक शेतकरी आहेत. म्हणजेच मागच्या वर्षीपेक्षा लाभधारक कमी झाल्याचे दिसते. २००८-०९ मध्ये मात्र त्यात वाढ होऊन १७२३०० इतकी प्रचंड प्रमाणात वाढली. पाच वर्षाचा विचार करता लाभधारक शेतक-यांमध्ये चढ-उतार दिसून येतो. एकुण पाच वर्षात ४०१२०० इतक्या शेतक-यांना राष्ट्रीय कृषी विमा योजनेचा लाभ झालेला दिसतो.

राष्ट्रीय कृषी विमा योजनेच्या लाभधारकांना दिलेल्या नुकसान भरपाईचा विचार करता २००६-०७ मध्ये १४०.५९ कोटी रु इतकी नुकसान भरपाई देण्यात आली. आणि एकुण २००६-०७ ते २०१०-११ या पाच वर्षाचा विचार करता १०९१-९१ कोटी रु भरपाई स्वरुपात शेतक-यांना मिळालेली आहेत.

वरील प्रमाणे राष्ट्रीय कृषी विमा योजनेची महाराष्ट्रातील प्रगती थोडक्यात सांगता येईल. महाराष्ट्रात राष्ट्रीय कृषि विमा योजनेची २००६-०७ ते २०१०-११ या कालावधीत प्रगती काहीशी समाधानकारक असली तरी या योजनेत काही दोष आहेत ते खालील प्रमाणे सांगता येतील.

१. ही योजना सर्व पिकांना व सर्व प्रदेशांना लागू नसल्यामुळे काही लोक तिच्यापासून वंचीत राहतात.

२. नुकसान भरपाईची पध्दत पुर्णपणे योग्य अशी नाही कारण, ती निश्चित करतांना मागील पाच वर्षाचे सरासरी उत्पन्न विचारात न घेता त्याचा ८० टक्के भाग विचारात घेऊन आवश्यक उत्पन्न ठरविले जाते.

३. नुकसान भरपाईच्या सुत्रानुसार मिळणारी रक्कम पिक कर्जाचा पूर्ण भाग समाविष्ठ करणारी नसते.

४. लाभार्थी शेतक-यांना नुकसान भरपाई ही खुप उशिरा दिली जाते. त्यामुळे त्यांना पुढील पिक घेण्यास आर्थिक अडचणी निर्माण होतात.

**५. शिफारशी -**

राष्ट्रीय कृषी विमा योजना ही शेतक-यांच्या पिकांचे नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास त्यांना विमा संरक्षण देण्यासाठी सुरु करण्यांत आलेली आहे. तसेच शेतक-यांना आर्थिक सहाय्य देणे, नविन तंत्रज्ञान वापरण्यास प्रोत्साहन देणे हे उद्देश साध्य होण्यासाठी तसेच ही योजना आधिक प्रभावी होण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना सुचविलेल्या आहेत.

१. योजनेत सर्व पिकांचा समावेश करण्यांत यावा. जसे - केळी, फळबाग इत्यादी आणि प्रत्येक भागातील ग्रामीण भागापर्यंत ही योजना पोहचण्याचा प्रयत्न करण्यांत यावा. जेणेकरुन दुर्गम भागातील शेतकऱ्यांना योजनेचा फायदा होईल.

२. राष्ट्रीय कृषी विमा योजनेत पिकांना पीक कापणीपर्यंत नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्यात येते. परंतु पीक कापणीनंतर जादा पाऊस, आग यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान झाल्यास नुकसान भरपाई देण्यात यावी.

३. या योजनेत शासनाने अधिसुचित केलेल्या क्षेत्रातील पीक कापणी प्रयोगावरुन उपलब्ध झालेले दर हेक्टरी सरासरी उत्पन्न उंबरठा उत्पन्नापेक्षा जास्त असल्यास त्या क्षेत्रातील विमाधारक शेतकऱ्याचे नुकसान झालेले असले तरी नुकसान भरपाई दिली जात नाही. तरी या क्षेत्रातील विमाधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दिली जावी.

४. उंबरठा उत्पन्न घेण्यासाठी मागील ३ ते ५ वर्षाचा विचार करण्यांत येतो. कधी कधी नैसर्गिक आपत्ती, दुष्काळ असे जर या २-३ वर्षात घडले तर उत्पन्न कमी होते. त्याचा परिणाम उंबरठा उत्पन्नावर होतो आणि विमाधारक शेतकऱ्यांना त्याचा फटका बसतो. त्यामुळे उंबरठा उत्पन्न ही संकल्पना शेतक-यांना योग्य न्याय मिळून देऊ शकत नाही असे दिसते.

५. या योजनेत पीक कापणी प्रयोग शासन स्तरावर केला जातो. पीक कापणी क्षेत्राची निवड, तालुका विभाग पातळीवर करण्यात येते. पीक कापणी प्रयोग ग्रामपंचायत व गावपातळीवर करण्यांत यावा व स्थानीक

शेतकऱ्यांना त्यात सहभागी करण्यांत यावे.

६. ग्रामपंचायतीला अधिकृत संस्था म्हणून कार्य करण्यास देणे जेणेकरुन ग्रामपंचायत कर्मचारी पिक विम्याची माहिती दुर्गम भागतील शेतकऱ्यांना पोहचवतील.

७. लाभधारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई लवकरात लवकर देण्यात यावी म्हणजे तो घेतलेले कर्ज अथवा नविन पिक उभारु शकेल.

८. या योजनेत सर्व विमा कंपन्यांनी सहभाग घेतला तर कार्यक्षेत्र हे विभागले जाईल आणि त्याचा फायदा जास्तीत जास्त शेतकरी घेऊ शकतील.

**निष्कर्ष -**

उपरोक्त विश्लेषणावरुन महाराष्ट्रातील राष्ट्रीय कृषी विमा योजनेची प्रगती समाधानकारक असल्याचे स्पष्ट होते. विविध योजनांच्या अंमलबजावणीत महाराष्ट्र नेहमीच आघाडीवर राहीलेले आहे. सदर योजनेत सर्व पिकांचा समावेश केल्यामुळे लहान शेतकऱ्यांना त्याचा फायदा झालेला आहे. तसेच दुर्गम भागतील शेतक-यांची योजनेतील सहभाग वाढण्यास मदत होईल.

**संदर्भ सूची :**

१. Govt. of Maharashtra (२०११) :- Economic Survey of Maharashtra (२००६-२०११).
२. Govt of India : Economic Survey of India
३. Tnay Agritech Portal : Crop Insurance Scheme
४. Gurdev Singh , Crop Insurance in India :- IIm Ahmedbad.
५. Govt. Of India, Crop Insurance-
६. Venkates, G, Crop Insurance in India - A Study Mumbai
७. Raja, SS and Ramesh Chand, Agriculture Insurance in India : Problems and Prospects,
८. Agriculture Insurance Company of India, Performance of NAIS,
९. डॉ. जय प्रकाश मिश्र, कृषि अर्थशास्त्र, साहित्य भवन, पब्लिकेशन्स.
१०. डॉ. विजय कविमंडळ, कृषी अर्थशास्त्र, मंगेश प्रकाशन.
११. कृषि विस्तार सेवा, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन.
१२. शेतकरी मासिक
१३. योजना मासिक
१४. भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगिता दर्पण.
१५. www.maharashtra.gov.in

१६. www.mahaagri.gov.in
१७. www.agricoop.nic.in
१८. www.indiaagronet.com
१९. www.indg.in/agriculture